# रूप तुझे

मुद्रित ७४ पान २८

रंग साजिरे, रंग गोजिरे
अरूपामध्ये रूप तुझे
वायुतून सुगंध विलसे
अणुरेणूतही रूप तुझे

कपोलकल्पित मर्त्यजगात
मूर्तिस्वरूपी सोस तुझे
साक्षात्कारी स्वप्नदर्शनी
उत्कटतेतून भास तुझे

तृणातृणातून मनामनातून
दरवळणारे श्वास तुझे
वादळवारा वर्षातून
रपकरवळणारे श्वास तुझे

चराचरातून चैतन्यातून
अग्नी आणि धूप तुझे
विश्वाच्या देहात विलसतो
आत्मा, एकच रूप तुझे.

— कवि सहदेव —

१७।८।५४